Vol-13 Special Issue- 2.1 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# मूल्यशिक्षण व रंगमंच समन्वय आणि विद्यार्थी विकास

**डॉ. संजय आर. शेजव**
प्राचार्य
स्व.संजय टोम्पे व स्व.समीर देशमुख शिक्षण महाविद्यालय चांदुर बाजार

## प्रस्तावना

मानवी जीवनात मूल्याला अनन्य साधारण महत्त्व आहे. शाळा ही मूल्यांचे संस्कार केंद्र आहे. विद्यार्थी शैक्षणिक जीवन जगत असताना विविध शैक्षणिक उपक्रमातून व्यक्त होत असतात. त्यांच्या कार्यकुशलेमध्ये मूल्ये अंतर्भूत दडलेली असतात. ती मूल्ये विद्यार्थी अथवा कुठलीही व्यक्ती ठरवून जगत नसतो.तर ज्या बाबी, जे जीवनाचे सकारात्मक आणि चांगले पैलू आहेत;त्यामधून मूल्ये निर्माण होत असतात. मानवी जीवन आणखी सुसंस्कृत होण्यासाठी मूल्यांची नितांत गरज असते.ही मूल्ये ठरवून निर्माण केली जात नाही; तर माणसाच्या जीवनाचा जो प्रवाह आहे त्या प्रवाहामध्ये कोणतीही व्यक्ती ज्या तात्विक दृष्टीने जगते आणि त्याच्या जगण्यामध्ये ज्या काही चांगल्या बाबी असेल, जे काही सकारात्मक विचार असतील, ज्याच्यामध्ये सचोटी आहे. प्रामाणिकपणा आहे. सत्यता आहे.विश्वासार्हता आहे.बोलण्यातील व जगण्यातील तत्वे ही मूल्याच्या समान पातळीवर आहेत; जसे की जो बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले. अर्थात जो खरं बोलतो आणि त्याच पद्धतीने जगतो त्याला लोकही त्याच दृष्टीने स्वीकारतात.अर्थात मानवी जीवन हे मूल्यविहित असणे अत्यंत महत्त्वाचे असते.ती मूल्ये जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात आपल्याला दिसून येतात. वेगवेगळ्या स्वरूपात दिसून येतात.ही मूल्ये अनेक प्रकारची आहेत. त्यामध्ये शालेय जीवनात शैक्षणिक मूल्ये आणि नैतिक मूल्ये हे प्रामुख्याने महत्त्वपूर्ण आहेत. आणि म्हणूनच मूल्य विरहित जीवन हे खऱ्या अर्थाने जीवन नाही. तर मूल्ययुक्त जीवन हेच खरे जीवन आहे. याच मूल्यांच्या अनुषंगाने जे शिक्षण घेतले जाते. जे शिक्षणाचे धडे घेतले जाते.त्यालाच खऱ्या अर्थाने मूल्यशिक्षण म्हणता येते. खरे पाहता मूल्यशिक्षण लहान मुलांना अगदी बालवाडी व प्राथमिक शाळेतील पहिल्या पायरी पासून दिले जाते.ती मुलं जसजशी मोठी होतात.' पुढच्या वर्गात जातात.तसतशी मूल्यांचे पाठ त्यांच्या मनावर संस्कारित केले जातात. ही मूल्ये शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये वेगवेगळ्या उपक्रमातून रुजविल्या जातात; आणि त्यातूनच मूल्य शिक्षणाची एक साखळी निर्माण केली जाते. यातूनच ही मुले-मुली, अर्थात विद्यार्थी मूल्य शिक्षणातून सुसंस्कारित व्हायला लागतात.प्राथमिक शाळेतील विद्यार्थी दशेपासून तर पुढील शिक्षणामध्ये वेगवेगळ्या उपक्रमातून विविध मूल्ये विद्यार्थ्यांच्या मनःपटलावर बिंबविल्या जातात.या मूल्यांमध्ये खेळ , क्रीडा साहित्य आणि कला व इतर मनोरंजनाची साधने व विविध माध्यमे या विद्यार्थ्यांमध्ये विविध कला गुण कौशल्य रुजविण्यास महत्वपूर्ण ठरत असतात. या विविध कलांमधील कलेमधील रंगमंच अर्थात नाट्यकला होय. नाट्य हा एक साहित्यातील एक विशेष प्रवाह आहे. या रंगमंचाच्या माध्यमातून लहानपणापासून पुढील वयातील मुले जेव्हा या रंगमंचावर आपलं सादरीकरण करतात.विविध नाटकांमध्ये विविध भूमिका करतात. या भूमिका अभिनयातून त्यांच्यामध्ये वेगवेगळी मूल्ये रुजविल्या जातात.कोणत्याही रंगमंचातून मुलांमध्ये आत्मविश्वास,सकारात्मक दृष्टिकोन, वर्तनातील बदल, सुसंवाद,बोलण्यातील लकबी, भाषाशैली याचबरोबर सहवास,मैत्री, आपुलकी, जिव्हाळा यासारखी विविध मूल्ये या रंगमंचातून विद्यार्थ्यांमध्ये संस्कारित होत असतात. त्यातूनच विद्यार्थ्यांचे एकूण व्यक्तित्व विकसित होत असते. म्हणूनच मूल्यशिक्षण आणि रंगमंच व विद्यार्थी विकास याचा परस्पर संबंध शैक्षणिक जीवनात प्रकर्षाने घडलेला दिसून येतो. शिक्षण क्षेत्रातील कला ज्या विविध पद्धतीने सादरीकरण केल्या जातात. त्यातूनच उद्याचा घडणारा नागरिक,कलावंत, अभिनयकर्ता ही सगळी संस्कार मूल्ये शिक्षणाच्या प्रवाहात विद्यार्थ्यांना आत्मसात करायची असतात.अर्थात शिक्षक मात्र ही

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

मूल्ये विविध उपक्रमाच्या माध्यमातून त्याची रुजवणूक करीत असतात.मूल्यशिक्षण व रंगमंच यांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत असतो.

## मूल्य म्हणजे काय?

मूल्य ह्या शब्दाला इंग्रजीत Value हा पर्यायी शब्द आहे.ऑक्सफर्ड इंगलिश डिक्शनरी नुसार Value हा शब्द Velere ह्या लॅटीन शब्दापासून तयार झालेला आहे. Valere चा अर्थ किंमतीचा असणे असा होतो. Value ह्या शब्दाचा अर्थ किंमत, दर्जा, व्याक्तीची गुणवैशिष्ट्ये, पात्रता, लायकी असा होतो.मूल्य म्हणजे महत्व, किंमत विश्वासार्हता,नैतिक मूल्ये (Moral Values) म्हणजे अशी तत्त्वे, नियम किंवा आदर्श होत.जे आपल्याला योग्य आणि अयोग्य यातील फरक समजून घेण्यास आणि चांगले वर्तन करण्यास मदत करतात. ही केवळ कायदे नसून माणसाच्या चारित्र्याची व व्यक्तिमत्त्वाची पायाभरणी करीत असतात.

**महत्त्वाची नैतिक मूल्ये** : प्रामाणिकपणा (Honesty): नेहमी खरे बोलणे आणि प्रत्येक गोष्टीत पारदर्शकता राखणे,आदर (Respect): इतरांच्या मतांचा, संस्कृतीचा आणि भावनांचा सन्मान करणे,जबाबदारी (Responsibility): आपल्या कृती आणि निर्णयांची जबाबदारी स्वीकारणे सहानुभूती/ दयाळूपणा (Compassion): इतरांच्या दुःखाची जाणीव असणे आणि गरजूंना मदत करणे, सदाचार (Integrity) कोणीही पाहत नसतानाही योग्य मार्गाचा अवलंब करणे ही मूल्ये व्यक्तीला एक चांगला, जबाबदार आणि सुसंस्कृत नागरिक बनवण्यास आणि समाजात शांतता व सलोखा राखण्यास अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात.

## मूल्य संज्ञा आणि संकल्पना

**आलपोर्ट च्या मते** 'मूल्य म्हणजे व्यक्तिमत्त्वाचा प्रभावी घटक'

**एन सी इआरटी नुसार**- 'जिची आकांक्षा धरावी वा पाठपुरावा करावा अशी गोष्ट म्हणजे 'मूल्य' होय.

**हेन्री ज्युल्स-** 'मूल्य म्हणजे ज्याला आपण चांगले समजतो असे'

**शेररच्या मते** 'मूल्य म्हणजे योग्य गोष्टील न्याय देणारे प्रमाणक किंवा तत्व होय'

**लिटन च्या मते**-'जी तत्वे अनेक परिस्थितीत समान राहतात व व्यक्तिला कार्याचे दिग्दर्शन करतात त्यांना मूल्ये असे म्हणतात'

**ऑक्सफोर्ड डिक्शनरी नुसार**-'मूल्य मानवीय इच्छाओं की संतुष्टि करने वाली वस्तुएं है इच्छा कीपूर्ति से सुख होता इसलिए सुख के अनुभूति में मूल्य की अनुभूति है'-

**क्लाइड क्लुखोहन** - 'मूल्य किसी व्यक्ति विशेष अथवा समूह का व्यक्त अथवा अव्यक्त विचार है जो क्रिया के प्राप्त साधनों एवं लक्ष्यों के चयन को प्रभावित करता है'

**डॉ. राधाकृष्णन-** शिक्षा केवल सूचनायें प्रदान करने या कौशलों के प्रशिक्षण तक सिमित नही । इन शिक्षितों को मूल्यो की उचित भावना प्रदान करनी होगी ।

**चक्रवर्ती राजगोपालाचार्य**-का विश्वास था कि 'विद्यार्थियों का चरित्र निर्माण नैतिक शिक्षा सेसंभव हैऔर उसी के आधार पर राष्ट्र का विकास संभव है'. माणूस उत्तम नागरिक आणि चांगला माणूस बनण्यासाठी नैतिक मूल्ये (Moral Values) पायाभूत असतात. आयुष्यात आचरणात आणण्यासाठी अत्यंत आवश्यक असलेली प्रमुख नैतिक मूल्ये खालीलप्रमाणे आहेत:

## नैतिक मूल्ये

**प्रामाणिकपणा (Honesty):** नेहमी खरे बोलणे आणि कोणतीही फसवणूक न करणे हा विश्वास आणि आदराचा पाया आहे.

**आदर (Respect):** इतरांच्या मतांचा, भावनांचा आणि संस्कृतीचा सन्मान करणे. यामध्ये वडीलधाऱ्यांचा आदर करणे आणि लहान्यांशी प्रेमाने वागणे समाविष्ट आहे.

**सहानुभूती (Empathy):** इतरांच्या दुःखाची किंवा परिस्थितीची जाणीव ठेवणे आणि त्यांच्या जागी स्वतःला ठेवून विचार करणे.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

**जबाबदारी (Responsibility)**: स्वतःच्या कृती, शब्द आणि निर्णयांची जबाबदारी स्वीकारणे. दिलेले वचन पाळणे आणि चुका सुधारण्याची तयारी ठेवणे.

**सहकार्य (Cooperation):** इतरांना मदत करणे आणि टीमवर्कच्या भावनेने काम करणे. एकमेकांना साथ दिल्याने कोणतीही मोठी समस्या सोडवणे सोपे जाते.

**सत्य** आणि न्याय (Truth and Justice): नेहमी सत्याच्या मार्गावर चालणे आणि सर्वांशी समान आणि निष्पक्ष न्याय व व्यवहार करणे

**कृतज्ञता (Gratitude):** आपल्या जीवनात ज्या चांगल्या गोष्टी आणि व्यक्ती आहेत, त्यांच्याबद्दल कृतज्ञ आणि समाधानी राहणे.

**संयम आणि क्षमा (Patience and Forgiveness)**: कठीण प्रसंगात स्वतःवर नियंत्रण ठेवणे आणि इतरांच्या चुका मोठ्या मनाने माफ करणे.

**स्वयं-शिस्त (Self-Discipline):** योग्य आणि अयोग्य यातील फरक समजून घेऊन स्वतःच्या वर्तनावर नियंत्रण ठेवणे आणि वेळेचे पालन करणे.

**करुणा आणि परोपकार (Compassion and Charity):** गरजूंना मदत करणे आणि निसर्गातील प्रत्येक घटकाबद्दल (प्राणी, पक्षी, पर्यावरण) दयाभाव ठेवणे.

मूल्यशिक्षण (Value Education) म्हणजे विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता, त्यांच्यात नैतिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि मानवी मूल्यांचा विकास करणे होय. ही अशी प्रक्रिया आहे जी व्यक्तीचे चारित्र्य घडवते, तिला सहानुभूती, जबाबदारी आणि आदर शिकवते, ज्यामुळे एक आदर्श व सुसंस्कृत समाज निर्माण होतो.मूल्यशिक्षणाच्या संकल्पनेची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत:चारित्र्य आणि व्यक्तिमत्त्व विकास: विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधून त्यांना एक उत्तम माणूस बनवणे.नैतिक मूल्यांची रुजवणूक: सचोटी,दयाळूपणा,सत्यप्रियता आणि न्याय यांसारख्या गुणांचा विकास करणे.सामाजिक जाणीव: राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय एकात्मता, सहिष्णुता आणि इतरांच्या मतांचा आदर करण्याची वृत्ती निर्माण करणे.जीवन कौशल्ये: कठीण प्रसंगात योग्य निर्णय घेणे, तणाव व्यवस्थापन आणि मानवी हक्कांचे रक्षण करणे.क्षमाशीलता,किंमत किंवा महत्त्व होय.

## मूल्यशिक्षण संज्ञा व संकल्पना :

'मूल्यशिक्षण' हा समाजिक शब्द आहे. तो मूल्य आणि शिक्षण या दोन शब्दाचा मिळून बनलेला आहे. मूल्यशिक्षण या शब्दाची मांडणी मूल्य आणि शिक्षण अशा दोन शब्दांमध्ये करता येते. मूल्य आणि शिक्षण या दोन शब्दाच्या उत्पत्ती नुसार मूल्य शिक्षणाचा अर्थ स्पष्ट करता येतो. 'मूल्य' हा मुळात संस्कृत शब्द आहे त्याचा अर्थ मोल असा होतो.'शिक्षण' हा मराठी शब्द आहे तो शिक्षा या संस्कृत शब्दापासून तयार झालेला आहे.'शिक्षा' हा शब्द शिक्षा या धातूपासून तयार झालेला आहे.धातू म्हणजे शब्दाचे मूळ रूप.'शिक्षा' या धातूचे दोन अर्थ होतात. शिक्षण म्हणजे ज्ञान मिळवणे. या शब्द व्युत्पत्तीनुसार मूल्य शिक्षण म्हणजे मोलाची ज्ञान प्राप्ती करणे. शिक्षण म्हणजे उपदेश करणे. वरील विश्लेषणानुसार 'मूल्य शिक्षण' म्हणजे मूल्याचा उपदेश करणे होय.मूल्यशिक्षणाला इंग्रजीत Value Education असे म्हटले जाते. Value हा इंग्रजी शब्द Valere ह्या लॅटिन शब्दापासून तयार झालेला आहे. Valere चा अर्थ मूल्यवान असणे असा होतो. व्यक्तीचे चांगले वागणे हेच खऱ्या अर्थाने मूल्यवान असते.Education हा इंग्रजी शब्द Educatum, Educere a Educare ह्या लॅटिन शब्दांपासून तयार झालेला आहे. Education म्हणजे To teach अर्थात अध्यापन करणे. ह्या व्युत्पत्तीनुसार मूल्यशिक्षण म्हणजे व्यक्तीने चांगले वागण्यासाठी तिला अध्यापन करणे होय. Educere म्हणजे To draw out अर्थात उन्नयन करणे. ह्या व्युत्पत्तीनुसार मूल्यशिक्षण म्हणजे व्यक्तीमधल्या चांगल्या गोष्टींचे उन्नयन करणे होय. Educare म्हणजे To rear अर्थात पालन करणे. ह्या व्युत्पत्तीनुसार मूल्यशिक्षण म्हणजे चांगल्या गोष्टींचे पालन करणे. Educare म्हणजे To nourish अर्थात पोषण करणे. ह्या व्युत्पत्तीनुसार मूल्यशिक्षण म्हणजे चांगल्या गोष्टींचे पोषण करणे. Educare म्हणजे To bring upअर्थात संवर्धन करणे. ह्या व्युत्पत्तीनुसार मूल्यशिक्षण म्हणजे

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

चांगल्या गोष्टींचे संवर्धन करणे होय. ह्यावरून असे म्हणता येते की, Value education is to teach values, to draw out values, to rear values, to nourish values and to bring up values.

## मूल्यशिक्षण संज्ञा

**हेन्री ज्यूल्स ह्यांच्या मते,** 'ज्या बाबीला आपण चांगले समजतो, त्या बाबीचे शिक्षण म्हणजे मूल्यशिक्षण होय'

**NCERT नुसार-** 'ज्या गोष्टीची आकांक्षा धरावी, पाठपुरावा करावा, अशा गोष्टीचे शिक्षण म्हणजे मूल्यशिक्षण' व्यक्तीच्या शारीरिक स्वास्थ्याला तसेच सामाजिक समायोजनाला, संस्कृतीला कार्यान्वित करणाऱ्या मार्गदर्शक जीवनतत्त्वांचे शिक्षण म्हणजे मूल्यशिक्षण.

**शेरर यांच्या मते**,-'एखादी जागा, वस्तू, कल्पना, कृती आणि परिस्थिती ह्यांच्या न्याय प्रमाणकांचे किंवा तत्त्वांचे शिक्षण म्हणजे मूल्यशिक्षण'.

**रॉकेच ह्यांच्या मते-**'चिरकाल टिकणारा विश्वास, एखाद्या विशिष्ट वर्तनाचे वळण, चांगल्या गोष्टी ह्यांची पानळी ठरविणाऱ्या निकषांचे शिक्षण म्हणजे मूल्य शिक्षण'.

**लिटन ह्यांनी केलेल्या मूल्याच्या व्याख्येच्या आधारे** असे म्हणता येते की, 'अनेक परिस्थितित समान राहणाऱ्या व व्यक्तीला कार्याचे निश्चित दिग्दर्शन करणाऱ्या तत्त्वांचे शिक्षण म्हणजे मूल्यशिक्षण'.

**आर. के. मुखर्जी ह्यांनी** केलेल्या मूल्याच्या व्याख्येच्या आधारे असे म्हणता येते की, 'समाजमान्य इच्छा व ध्येये ह्यांचे शिक्षण म्हणजे मूल्यशिक्षण'.

**सी. व्ही. गुड ह्यांनी** केलेल्या मूल्याच्या व्याख्येच्या आधारे असे म्हणता येते की, व्यक्तीच्या क्षमता, अभियोग्यता व दृष्टिकोण ह्यांच्या अनुषंगाने वर्तन विकसित करणाऱ्या एकात्म साधनांचे शिक्षण म्हणजे मूल्यशिक्षण.

**ऑलपोर्ट ह्यांनी केलेल्या मूल्याच्या** व्याख्येच्या आधारे असे म्हणता येते की, व्यक्तिमत्त्वाला प्रभावी करणाऱ्या घटकांचे शिक्षण म्हणजे मन्यशिक्षण.

**डी. एच. पारकर ह्यांच्या मते**' मनाच्या आतला आवाजाचे शिक्षण म्हणजे मूल्य शिक्षण होय'

**डॉ. संतोष मुळावकर यांच्या मते** 'मानवी जीवनाला सात्त्विक करणाऱ्या तात्त्विक बाबींचे, मनाला सशक्त करणाऱ्या, वर्तनाला इष्ट वळण देणाऱ्या, मनाला व वर्तनाला इष्ट दिशेने प्रयत्नशील ठेवणाऱ्या बाबींचे शिक्षण म्हणजे मूल्यशिक्षण' होय.

वरील सर्व शिक्षण तज्ञ व विचारवंतांनी मांडलेल्या मूल्य शिक्षणाच्या संकल्पनेची व्यापकता लक्षात घेता येते. यातूनच मूल्य आणि शिक्षण किती महत्वाचे आहे आपणास विविध मूल्यांच्या संस्कारातून विद्यार्थी एक व्यक्ती आणि सुजाण नागरीक जेव्हा समाजात उभा होतो. तेव्हाच आपणास मूल्याशीकवाचे महत्व कळायला लागते.

**मूल्यशिक्षणाची उद्दिष्ट्ये :** मूल्य शिक्षणाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास (Holistic Development) करणे हा आहे. याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये नैतिक, सामाजिक आणि मानवी मूल्यांची पायाभरणी करून त्यांना एक जबाबदार नागरिक बनवले जाते.याची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत :

**चारित्र्य निर्माण :** विद्यार्थ्यांमध्ये प्रामाणिकपणा, सत्यता, शिस्त आणि संयम यांसारखे गुण विकसित करणे.

**सहानुभूती आणि सामाजिकता** : इतरांच्या भावना समजून घेणे, आदर करणे आणि समाजोपयोगी कार्य करण्याची वृत्ती निर्माण करणे.

**नैतिक निर्णयक्षमता** : योग्य आणि अयोग्य यातील फरक ओळखण्याची क्षमता निर्माण करणे आणि कठीण प्रसंगात योग्य निर्णय घेणे.

**राष्ट्रप्रेम आणि नागरी जाणिवा :** संविधानाचा आदर करणे, देशाविषयी प्रेम बाळगणे आणि सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडणे.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

**भावनिक विकास :** ताणतणाव हाताळणे, सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे आणि भावनिक समतोल राखणे.

**मूल्य शिक्षणाचे प्रकार :** मूल्य शिक्षण हे व्यक्तीच्या चारित्र्य आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे. यामुळे विद्यार्थ्यांना योग्य-अयोग्य यातील फरक समजतो. मूल्य शिक्षणाचे वर्गीकरण प्रामुख्याने खालील प्रकारांमध्ये केले जाते:

**नैतिक मूल्ये** : यामध्ये प्रामाणिकपणा, सत्यता, दयाळूपणा, निष्ठा आणि न्यायाची भावना यांचा समावेश होतो.

**व्यक्तिगत मुल्ये-** हे व्यक्तीच्या वैयक्तिक विश्वास आणि वर्तनावर आधारित असतात. यामध्ये आत्मविश्वास, शिस्त आणि स्वाभिमान यांचा समावेश होतो.

**सामाजिक मूल्ये (Social Values):** समाजात शांततापूर्ण जीवन जगण्यासाठी आणि इतरांशी सकारात्मक संवाद साधण्यासाठी ही मूल्ये महत्त्वाची असतात. यात सहकार्य, सहनशीलता आणि सामाजिक जबाबदारी यांचा समावेश होतो.

**सांस्कृतिक मूल्ये (Cultural Values**): यामध्ये समाजाच्या पारंपारिक प्रथा आणि वारशाचा आदर करणे शिकवले जाते.

**आध्यात्मिक मूल्ये (Spiritual Values**): कोणत्याही विशिष्ट धर्माच्या पलीकडे जाऊन, आंतरिक शांतता, समाधान आणि विश्वासाची भावना निर्माण करणे हा याचा उद्देश असतो.

**नागरी मूल्ये (Civic Values):** ही लोकशाही आणि चांगल्या नागरिकत्वाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असतात.

## मूल्य शिक्षणाचे महत्त्व :

'मूल्यशिक्षण' म्हणजे विद्यार्थ्यांच्या स्वभावात नैतिकता, शिस्त आणि चांगल्या वर्तनाची शिकवण रुजवणे होय। हे केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित नसून, व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी आणि तिला एक संवेदनशील व जबाबदार नागरिक बनवण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे।मूल्य शिक्षणाचे प्रमुख फायदेमूल्य शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये खालील गुणांचा विकास होतो:चारित्र्य निर्माण: शैक्षणिक ज्ञान नोकरी मिळवून देऊ शकते, परंतु चांगले चारित्र्य आयुष्य घडवते. यामुळे प्रामाणिकपणा आणि संयम हे गुण विकसित होतात।जबाबदार नागरिकत्व: व्यक्तीला आपल्या हक्कांसोबतच समाजाप्रती आणि राष्ट्राप्रती असलेल्या कर्तव्यांची जाणीव होते।सहानुभूती आणि आदर: इतरांच्या भावना समजून घेणे, एकमेकांना मदत करणे आणि वडीलधाऱ्यांचा आदर करणे ही मूल्ये शिकवली जातात।सकारात्मक दृष्टिकोन: जीवनातील कठीण प्रसंगांना आत्मविश्वासाने आणि योग्य निर्णयाने सामोरे जाण्याची क्षमता वाढीस लागते.

## मूल्य शिक्षणाची गरज आणि महत्व :

'मूल्यशिक्षण'**(Value Education)** म्हणजे केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे, तर व्यक्तीच्या अंगी प्रामाणिकपणा, सहानुभूती, आदर आणि जबाबदारी यांसारखे नैतिक गुण रुजवणे होय. आजच्या आधुनिक आणि धावपळीच्या जगात सुसंस्कृत, जबाबदार आणि संवेदनशील नागरिक घडवण्यासाठी मूल्य शिक्षणाची गरज अत्यंत आवश्यक आहे. मूल्य शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये योग्य आणि अयोग्य यातील फरक समजण्याची क्षमता निर्माण होते, ज्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि चारित्र्य घडते.भावनिक बुद्धिमत्ता (Emotional Intelligence): हे शिक्षण व्यक्तीला इतरांच्या भावना समजून घेण्याची (सहानुभूती/Empathy) आणि ताणतणावाच्या स्थितीतही शांत राहून योग्य निर्णय घेण्याची कला शिकवते。 सामाजिक सुसंवाद: समाजात शांतता, बंधुभाव आणि परस्पर सहकार्य टिकवून ठेवण्यासाठी नैतिक मूल्यांची अत्यंत गरज असते.पर्यावरण आणि आरोग्याची जाणीव: मूल्य शिक्षणामुळे निसर्गाचा आदर करणे आणि आरोग्याची काळजी घेणे यासारख्या महत्त्वपूर्ण बाबी शिकायला मिळतात.

## मूल्य आणि कला :

मानवाच्या भावभावनांना अविस्कृत करण्यासाठी गवसलेले नितांत सुंदर माध्यम म्हणजे कला होय. त्यामध्ये शिल्पकला, चित्रकला, गायन,कला वादन कला नृत्यकला, संभाषण कला, लेखन कला, अभिनय कला,चित्रकला, दिग्दर्शन कला, संघटन कला, व्यवस्थापन कला, संपादन कला अशी कलांची कितीतरी नावे सांगता येतात. इतक्या कला आपल्या अवती भवती च्या

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

वातावरणात विविध विद्यार्थी व व्यक्तिच्या अंगी दिसून येतात. कलेच्या संदर्भात राष्ट्रसंत तुकडोजी म्हणतात की, एक तरी अंगी असू दे कला, नाही तर काय फुका जन्मला. यावरून कलेचे महत्व लक्षात येते. साहित्या प्रमाणेच कलांची निर्मिती झाली.एखादी कला का भावली? याचा शोध घेताना मानवाला कलेच्या अंतरंगातील मूल्यवस्थेत दडलेले मूल्य म्हणजे एकाग्रता होय.कलेच्या आविष्कार जमला पाहिजे. ती सर्वांग सुंदर झाली पाहिजे. याची जाणीव ठेवून एकाग्रता हे मूल्य आत्मसात केले पाहिजे.कलेचा अविष्कार अप्रतिम भाव या जाणिवेतूनच कलाभिरुची हे मूल्य विकसित होते. कलेचा आविष्कार होताना आपण देहभान विसरत.कलेचा आस्वाद घेताना रसिकही देहभान विसरला पाहिजे. त्यासाठी कला बहारदार झाली पाहिजे. ही जाणीव कलावंतामध्ये निर्माण झाली पाहीजे. सौंदर्यदृष्टी हे मूल्य व्यक्तिच्या व्यक्तित्वाला जोपासते व विकसित करते.कलेची मूल्ये कलेच्या कले कलेने विकसित होत असतात.कला ही कलेसाठीच असते की जर कलावंताची धारणा असेल तर कलेच्या आविष्कारणातून निखळ कलात्मक मूल्यांचा विकास साधला जातो. कला ही जीवनासाठी असते हे जर कलावंताची धारणा असेल तर कलेच्या आविष्कारणातून सत्य, करूणा ,अहिंसा परिवर्तनशीलता,प्रायोगिकता पुरोगामीत्व हे जीवन विषयक मूल्ये प्रत्येकाला प्राप्त होत असतात. दोन्ही धारणांचा समन्वय असेल तर कला ही कलात्मक व जीवन विषयक मूल्यांचा स्त्रोत ठरते. हे ही तितकेच खरे आहे.

## मूल्यशिक्षणात रंगमंचाचे महत्त्व :

रंगमंचाच्या माध्यमातून मूल्यशिक्षण कशा प्रकारे दिले जाते, याची माहिती खालील मुद्द्यांवरून स्पष्ट होते.

**अनुभूतीतून शिक्षण:** पुस्तकी ज्ञानापेक्षा प्रत्यक्ष नाटकात काम केल्यामुळे किंवा नाटक पाहिल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात विचारांचे व **संस्कारांचे कायमस्वरूपी ठसे उमटतात।**

**सहानुभूती आणि संवेदनशीलता:** नाटकात काम करताना विद्यार्थी दुसऱ्या पात्राच्या भूमिकेत शिरतात. यामुळे त्यांच्यात इतरांच्या भावना समजून घेण्याची (Empathy) आणि संवेदनशीलतेची भावना निर्माण होते।

**सहकार्य आणि संघभावना:** नाटक ही एक सांघिक (Teamwork) कला आहे. यामध्ये काम करताना विद्यार्थ्यांना एकत्र काम करणे, एकमेकांना मदत करणे आणि जबाबदारीची जाणीव होते।

## मराठी रंगमंच आणि मूल्यशिक्षण :

मराठी साहित्यात आणि रंगमंचावर नेहमीच मूल्याधिष्ठित नाटकांची मोठी परंपरा राहिली आहे.ऐतिहासिक व पौराणिक नाटके: छत्रपती शिवाजी महाराज, संत तुकाराम किंवा इतर महापुरुषांच्या जीवनावर आधारित नाटकांतून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, शौर्य, त्याग आणि समाजसेवेची मूल्ये रुजवली जातात. आपण जेव्हा मराठी रंगमंच, रंगभूमीचा आढावा घेताना असे दिसून येते की महाराष्ट्रात रंगभूमी व रंगमंचाची पिढीच्या पिढी उभारलेली दिसून येते. आणि या पिढ्यानीच मराठी रंगभूमीला तितकेच समृद्ध केलेले आहे.

## बालरंगभूमी :

महाराष्ट्रात अनेक बालनाट्य शिबिरे घेतली जातात. या शिबिरांमधून मुलांमध्ये वक्तशीरपणा, आत्मविश्वास, वक्तृत्व आणि श्रमप्रतिष्ठा या गुणांची नकळत वाढ होते।मूल्यशिक्षणाच्या संकल्पना महाराष्ट्र शासनाच्या अभ्यासक्रमानुसार, शिक्षणामध्ये प्रमुख मूल्यांना जतन करण्याचे प्राधान्य दिले आहे:वक्तशीरपणा ,संवेदनशीलता ,वैज्ञानिक दृष्टिकोन ,राष्ट्रभक्ती व श्रमप्रतिष्ठा हे गुण केवळ पाठांतराने येत नाहीत, तर ते रंगमंच आणि विविध कला उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या आचरणात आणणे शक्य होते.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

## मूल्यशिक्षण (Value Education) आणि रंगमंच (Theatre) यांचा समन्वय :

मूल्यशिक्षण (Value Education) आणि रंगमंच (Theatre) यांचा समन्वय हा विद्यार्थ्यांना सैद्धांतिक ज्ञानाऐवजी प्रत्यक्ष अनुभवातून सुसंस्कृत आणि जबाबदार नागरिक बनवण्याचा एक अत्यंत प्रभावी मार्ग आहे। या दोन्हीच्या मिलाफामुळे विद्यार्थ्यांना मूल्यांचे केवळ आकलन होत नाही, तर ती त्यांच्या आचरणातही येतात.मूल्यशिक्षण आणि रंगमंच समन्वय परस्परसंबंध अत्यंत खोल आणि प्रभावी आहे.रंगमंच हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून, ते मानवी मूल्ये, संस्कार आणि नैतिकता प्रत्यक्ष कृतीतून शिकवण्याचे एक शक्तिशाली माध्यम आहे. लहान मुलांच्या आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी याचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो.

## मूल्यशिक्षण आणि रंगमंच समन्वयाची प्रमुख वैशिष्ट्ये

**अनुभूती आणि सहानभूती** (Empathy): विद्यार्थ्यांना एखाद्या पात्राच्या भूमिकेत (Role Play) उतरवून नाटक सादर करायला लावल्याने, ते इतरांच्या भावना, दुःख आणि दृष्टिकोन अधिक चांगल्या प्रकारे समजू शकता

**सहकार्य आणि सांघिक भावना**: नाटकाच्या निर्मितीमध्ये दिग्दर्शन, नेपथ्य, अभिनय अशा अनेक भूमिका असतात। यामुळे विद्यार्थी एकमेकांना समजून घेतात आणि सांघिक कार्य (Teamwork) शिकतात।

**नैतिक मूल्यांची थेट मांडणी**: अहिंसा, सत्य, पर्यावरण संवर्धन, स्त्री-पुरुष समानता, आणि सामाजिक बांधिलकी यांसारख्या विषयांवर छोटे पथनाट्य किंवा एकांकिका बसवल्याने विद्यार्थ्यांच्या मनात त्या मूल्यांचे बीज खोलवर रुजते।

**आत्मविश्वास आणि संवाद कौशल्य:** रंगमंचावरील सादरीकरणामुळे विद्यार्थ्यांमधील भीती नाहीशी होते, आत्मविश्वास वाढतो आणि त्यांची संवादशैली समृद्ध होते. रंगमंचाचा वापर करून मूल्यशिक्षण देणे ही केवळ मनोरंजनाची बाब न राहता, चारित्र्य संवर्धनाचे एक अत्यंत सशक्त माध्यम बनते.रंगमंचाद्वारे मूल्यशिक्षणाचा हा दृष्टिकोन वर्गात किंवा शाळेत प्रत्यक्ष राबवण्यासाठी, तुम्हाला खालीलपैकी कोणत्या माहितीची गरज आहे? रंगमंच हा मूल्यशिक्षणाचा एक प्रभावी आणि जिवंत मार्ग आहे. नाटके, भूमिका (रोल-प्ले) आणि संवादांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता, सहकार्य आणि नैतिक मूल्यांची सहज रुजवणूक होते. मौखिक उपदेशापेक्षा प्रत्यक्ष कृतीतून मूल्ये शिकणे अधिक परिणामकारक ठरते.

## मूल्य व रंगमंचाच्या समन्वयातून विद्यार्थी विकास :

अगदी बालवाडी पासून तसेच प्राथमिक शाळेतील पहिल्या वर्गात प्रवेश करण्यापासून लहान मुले शालेय वातावरणात दैनंदिन शैक्षणिक जीवनात मुले रममान होत असतात. ही मुले शालेय वातावरणातून उभी होत असताना ज्या शाळेच्या आवारातील दैनंदिन उपक्रम आणि त्यांची जशी दिनचर्या असते. यातूनच अगदी शाळेमध्ये वेळेवर पोहोचण्यापासून ते घरी पोहोचण्यापर्यंत मुलांच्या अंगी विविध मूल्ये विकसित होत असतात. ती मूल्ये त्यांना दृश्यरूपाने दिसत नसले तरी ही सर्व मूल्ये या विद्यार्थ्यांचा पालकांशी, शिक्षकांशी, मुख्याध्यापकाशी,त्याच्या शाळेतील ग्रंथालय परिचर, शिक्षकेतर कर्मचारी त्याचे मित्र व सवंगड्याशी जिथे जिथे संवाद येतो, त्या त्या ठिकाणी त्याच्या आंतर संवादातून वेगवेगळी मूल्ये विकसित होत असतात.बालवाडी,प्राथमिक शाळा उच्च प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय आणि वरिष्ठ महाविद्यालय व विविध शाखांमधील विद्यार्थी हा त्याच्या शाळा कॉलेजमध्ये अभ्यासपूरक व अभ्यासेत्तर कार्यक्रमांमध्ये सहभागी होत असतो.या अभ्यासक्रमामध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रम अर्थात महाविद्यालयाला 'युवा महोत्सव' असे म्हणतात. तर सगळ्या शाळांमध्ये क्रीडा महोत्सव, कला प्रदर्शनी, सांस्कृतिक कार्यक्रम पुष्पप्रदर्शनी, अश्या विविध कार्यक्रमांची रेलचल त्या शाळेमध्ये अथवा कॉलेजमध्ये होताना दिसून येते. या सगळ्या सांस्कृतिक कलांमध्ये नाट्यकला ही एक आणखी वेगळी कला आहे. ज्या कलेला अभ्यासक्रमामध्ये रंगमंच कला अर्थात नाट्यकला असे म्हणतात. रंगमंच कला ही सर्वच विद्यार्थ्यांमध्ये अंतर्भूत नसते. परंतु विद्यार्थी जसजसा त्याच्या शालेय व महाविद्यालयीन जीवनात दैनंदिन सास्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभागी होतो. तसतसं त्याच्या मनावर अनेक

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

मूल्यांचे संस्करण होत जाते. त्यामधील काही विद्यार्थी नाट्यकलेमध्ये सहभागी होताना दिसून येतात. नाट्यकला ही इतर कलांच्यापेक्षा आणखी वेगळी कला आहे. ज्या कलेमध्ये एखाद्या मराठी किंवा कोणत्याही भाषेतील नाटक आणि त्याचे प्रयोग सादर केल्या जातात. ते रंगमंचावरच सादर केले जातात.या रंगमंचावर जेव्हा ही मुलं वेगवेगळ्या नाटकाच्या विविध पात्रांची भूमिका किंवा त्यामधील अभिनय करताना जेव्हा ते रंगमंचावर आपलं साजेस सादरीकरण करतात त्यावरूनच त्यांचा रंगमंचावरील असलेला आत्मविश्वास त्यांची संवाद शैली त्या पात्राशी त्यांची होणारी एकरूपता आणि रसिकांना आपल्या अभिनयातून आकर्षित करून घेण्याचं कौशल्य जेव्हा या विद्यार्थ्यांमध्ये आत्मसात केल्या जाते. तेव्हा तो रंगमंच आणि ते नाटक आणखी रसिक आणि श्रोतांना आवडायला लागते.अशा पद्धतीचे विविध नाटके शालेय आणि महाविद्यालयीन जीवनात वेगवेगळ्या विभागातील शिक्षक- शिक्षिका ही नाट्याची परंपरा सांस्कृतिक कार्यक्रमातून घडवून आणत असतात.त्यामुळे मूल्ये आणि रंगमंच या दोन घटकाच्या समन्वयातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास विविध मूल्यांच्या माध्यमातून होत असतो. म्हणूनच ही मूल्ये जितके शाळा महाविद्यालयांमध्ये महत्त्वाची आहेत तितकीच ती अध्ययन अध्यापन प्रक्रियेमध्ये अथवा अध्यापक व शिक्षण महाविद्यालयामध्ये महत्त्वपूर्ण आहेत. कारण शिक्षण महाविद्यालयामध्ये सुद्धा विविध नाटकांचे जेव्हा नियोजन सांस्कृतिक कार्यक्रमात केले जातात तर ती मुले मुली आपल्या कौशल्याने रंगमंचावर विविध मूल्यांना प्रदर्शित करून प्रकट होत असतात. एकूणच मुले आणि रंगमंच व विद्यार्थी विकास याचा अगदी निकडीचा परस्परसंबंध आहे. हे आपणास शालेय वातावरणातून लक्षात येते आणि रंगमंचावर जी मुले अगदी शालेय जीवनात आपल्या कौशल्यातून सादर होतात. आपली कला सादरीकरण करतात. ती मुले भविष्यात एक चांगले नाट्य कलावंत म्हणून समाजामध्ये उभे होऊ शकतात. या नाट्य कलावंताच्या अंगी शालेय जीवनातून जे जे काही मूल्ये प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या त्याच्या व्यक्तिमत्त्वांमध्ये रुजविले जातात. ती मूल्ये एकूण विद्यार्थी विकासाच्या साठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरत असतात. त्यामध्ये विद्यार्थ्यांचा वक्तशीरपणा त्याच्यामध्ये सहानुभूती संवेदनशीलता, आत्मविश्वास, बोलण्यातील सुसंवाद,शब्द फेक, भाषाशैली रसिकांना खिळवून ठेवणारी भाषा संवाद, चेहऱ्यावरील हावभाव, विनोद रुबाबीपणा, यासारखी विविध मूल्ये त्या भूमिकेतून रंगमंचाच्या सादरीकरणातून व्यक्त होताना दिसून येते. म्हणूनच मूल्ये मूलाशिक्षण आणि रंगमंच व विद्यार्थी विकास याचा समन्वय योग्य पद्धतीने झाल्यास विद्यार्थ्यांच्या एकूण जीवनशैलीवर आणि व्यक्तिमत्त्वावर त्याचा सकारात्मक परिणाम होतो.

## सारांश :

उपरोक्त शोधनिबंधातील विषयानुसार मूल्यशिक्षण व रंगमंच यांच्या समन्वयातून विद्यार्थ्यांचा विकास या विषयाच्या अनुषंगाने जेव्हा मांडणी केलेली आहे तेव्हा अगदी विषयाच्या प्रस्तावनेपासून मूल्ये ही दैनंदिन जीवनात कशी निर्माण होत असतात. मूल्याची संकल्पना आणि मूल्यातून विद्यार्थी विकास व एकूण समाजातील व्यक्तिमत्व कसे विकसित होत असतात. याची मांडणी विविध मुद्द्यांच्या आधारे केलेली आहे. त्यामध्ये मूल्य हे समाजात कसे निर्माण होतात. मूल्याच्या संदर्भात विविध विचारवंतांनी सांगितलेल्या संज्ञा संकल्पना. त्यानंतर ही मूल्ये शिक्षणाच्या माध्यमातून कशी प्रभावित होत असतात.त्या संदर्भात मूल्यशिक्षण त्याची संकल्पना, महत्त्व, स्वरूप,गरज उद्दिष्टे आणि ही मूल्ये अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये कशी रुजविल्या जातात.या याबाबतचे साधक-बाधक विवेचन वरील मुद्द्यांच्या आधारे केलेले आहे. या शोध निबंधाच्या माध्यमातून आपणास असे स्पष्टपणे म्हणता येईल की जीवन मूल्ये ही अगदी प्राचीन काळापासून आजच्या आधुनिक काळापर्यंत अर्थात आजच्या माहिती तंत्रज्ञान युगामध्ये सुद्धा तितकीच महत्त्वपूर्ण आहेत.मूल्य शिवाय शिक्षण घेणे म्हणजे ती व्यवस्था अधू होणे होय. शिक्षणामध्ये मूल्य जर असेल तरच त्या शिक्षणाला सकारात्मक दृष्टीने समाज बघत असतो;आणि त्याचा परिणाम ही समाजातील विद्यार्थ्यांमध्ये, मुलांमध्ये सकारात्मक स्वरूपाचा आढळून येतो. ही मुले जस-जसी प्राथमिक शाळेपासून ते पुढील शिक्षण घेत राहतात आणि त्यानंतर शिक्षकी पेशासाठी आवश्यक असलेलं प्रशिक्षण अर्थात अध्यापक प्रशिक्षण, शिक्षण प्रशिक्षण या सगळ्या शैक्षणिक क्षेत्रातील मुले मूल्यांच्या आधारे आपला दैनंदिन नित्यक्रम करीत असतात. आणि ही मूल्ये

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

त्याच्या व्यक्तिमत्त्वाला एक सुंदर आकार देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत असतात. म्हणूनच मूल्य शिक्षण रंगमंच अर्थात नाटक व नाट्याचे सादरीकरण, नाटकातील संवाद या सर्व बाबीतून विद्यार्थी जेव्हा आपलं व्यक्तिमत्व निर्माण करीत असते. त्यातूनच त्याच्या एकूण सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाचा विकास घडताना आपणास दिसून येतो. मूल्य ही विद्यार्थी व व्यक्तीच्या व्यक्तित्वाला संस्कारित करून आकार देत असतात. मूल्या शिवाय विद्यार्थ्यांचे किंवा व्यक्तीचे जीवन म्हणजे नकारात्मक जीवन. नीरस जीवन. म्हणता येईल. मूल्याने प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाला एक वेगळा आकार येतो. त्याच्या व्यक्तिमत्त्वाला एक वेगळे स्वरूप येतं. त्याच्या व्यक्तिमत्वातून जी मूल्य साकारली जातात त्यामुळे शालेय तथा महाविद्यालयीन जीवनात व कुटुंब आणि समाजामध्ये सुद्धा त्या विद्यार्थ्यांचा, मुलाचा आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव विविध घटकांच्या माध्यमातून होत असतो. म्हणूनच या मूल्यांच्या माध्यमातून शालेय जीवनात विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडत असते फुलारत असते. विकसित होत असते. त्यामुळे मूल्य शिक्षण आणि नाटय कला, रंगमंच या बाबी त्याच्या जीवनात तितक्याच महत्वपूर्ण ठरत असतात. ज्यामुळे हे विद्यार्थ्यांच्या एकण व्यक्तिमत्त्वाला आकार देण्यास साह्यभूत ठरत असतात. त्याप्रमाणेच NEP 2020 नुसार सुद्धा B.Ed च्या अभ्यासक्रमात Drama and Art in Education हा विषय समाविष्ठ करण्यात आला. ज्यामुळे येणाऱ्या काळातील विद्यार्थी-शिक्षक हा सर्व गुण संपन्न आणि अभिनयाभिमुख निर्माण व्हायला पाहीजे. जी आजच्या आधुनिक तंत्रज्ञान युगाची गरज आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची

डॉ. संतोष मुळावकर 'मूल्यशिक्षण: सुसंवाद विद्या प्रकाशन नागपूर, 4 ऑक्टोबर 2005

डॉ. सौ किरण नागतोडे 'नैतिकमूल्य शिक्षण' विद्या प्रकाशन नागपूर-2006

डॉ शोभा समवाल केला 'मूल्यशिक्षा' आर लाल बुक डिपो मेरठ-2008

Dr.Jasraj Kaur/Dr Satish Kumar Pandey 'Drama and Art in Education'R.Lall Book Depot Meerut-2008

Teacher's Welfare is Nation's Welfare
CTEF
Council for Teacher Education Foundation
ESTD. 1985